आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभेचं आजचं कामकाज सुरू होताच गदारोळामुळे एका मिनिटात तहकूब; कामकाज वारंवार खंडित होण्याला विरोधी पक्ष जबाबदार असल्याची किरेन रिजिजू यांची टीका

- आसामच्या मुख्यमंत्र्यांवर आक्षेपार्ह चित्रफीत प्रसृत केल्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयाचा होकार

- महाराष्ट्राच्या नवनियुक्त उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्वीकारला पदभार

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची इयत्ता बारावीची परीक्षा आजपासून सुरू

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत नामिबियाचं नेदरलँडसमोर १५७ धावांचं आव्हान

**<><><><><>**

लोकसभेचं आजचं कामकाज सकाळी अकरा वाजता सुरू होताच केवळ एका मिनिटात कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दुपारी २ वाजेपर्यंत  तहकूब करण्यात आलं.

सदनाचं कामकाज सकाळी सुरु झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक सह  विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी सुरु केली. या गदारोळातच केंद्रीय पशुपालन आणि दुग्ध उत्पादन राज्यमंत्री एस. पी. सिंह यांनी प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पीठासीन अधिकाऱ्यांनी अनेकदा सूचना देऊनही गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज वारंवार खंडित होण्याला विरोधी पक्ष जबाबदार असल्याची टीका संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली. ते आज संसद परिसरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. विरोधी पक्षाला संसदेच्या प्रतिष्ठेबाबत कसलाही आदर नाही हे त्यांच्या वर्तनातून दिसून येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे.

**<><><><><>**

लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यावर अविश्वास ठराव आणण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांना भेटल्यानंतर घेण्यात येईल, असं विरोधी पक्षांनी आज सांगितलं. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जु खरगे यांच्या दालनात आज सकाळी विरोधी पक्षांची बैठक झाली, त्यात हा निर्णय झाला. काँग्रेससह डावे पक्ष, समाजवादी पक्ष, द्रमुक आदी पक्षांनी या ठरावाच्या सूचनेवर स्वाक्षरी केली आहे. सभागृहातलं कामकाज सुरळीत व्हावं यासाठी चर्चा करण्यासाठी सभापतींनी आज विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलावलं आहे. त्यानंतर नोटीशीवर निर्णय घेतला जाईल.

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार प्रदर्शन करण्यास मनाई त्याचप्रमाणे विरोधी पक्षांच्या आठ सदस्यांच्या निलबंनानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

<><><><>

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची एका विशिष्ट समुदायावर बंदुकीने निशाणा साधतानाची चित्रफीत प्रसृत झाल्याप्रकरणी सरमा यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या डाव्या पक्षांच्या नेत्यांच्या याचिकेवर सुनावणी घ्यायची तयारी सर्वोच्च न्यायालयाने दर्शवली आहे. भाकप आणि माकप च्या नेत्यांच्या वतीने वकील निजाम पाशा यांनी ही याचिका दाखल केली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि एन व्ही अंजारीया यांच्या पीठाने याची दखल घेतली असून ही याचिका सूचिबद्ध करण्यात येईल असं सांगितलं. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी विशिष्ट धर्मियांविरोधात केलेल्या द्वेषपूर्ण भाषणं आणि चित्रफीत प्रकरणी गुन्हा दाखल केला गेला नाही, या प्रकरणी न्यायालयाने हस्तक्षेप करावा अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

<><><><>

मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणात कोणालाही अडथळा निर्माण करू दिला जाणार नसल्याचं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती एन व्ही अंजारिया यांच्या पीठानं हे स्पष्ट केलं. पश्चिम बंगालमध्ये सुरु असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणा संदर्भात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दाखल केलेल्या याचिकांवरच्या सुनावणी दरम्यान न्यायालयानं हे स्पष्ट केलं.

ममता बॅनर्जी यांनी राज्यात सुरु असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणात मोठ्या संख्येनं मतदारांची नावं वगळली जातील, अशी भीती व्यक्त केली आहे.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज नवी दिल्लीत होणाऱ्या सायबर फसवणुकीला प्रतिबंध आणि त्याचं संपूर्ण जाळं उद्ध्वस्त करण्यावर आधारित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते भाषण करणार आहेत. या कार्यक्रमात ते केंद्रीय अन्वेषण ब्युरोच्या नव्या सायबर गुन्हे शाखेचं उद्घाटनही करणार आहेत. याशिवाय, त्यांच्या हस्ते राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या डॅशबोर्डचं उद्घाटनही होणार आहे. देशातलं सायबर फसवणुकीचं प्रमाण, प्रवृत्ती आणि बदलतं स्वरूप याबाबत जागरूकता निर्माण करणं हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

<><><><><>

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर यांची नवी दिल्लीत भेट घेतली. धोरणात्मक संबंध बळकट करणं, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू उत्पादन आणि पुरवठा साखळीत लवचिकता आणणं या मुद्द्यांवर दोघांनी चर्चा केली. २०२६ एआय इम्पॅक्ट समिटमधे अमेरिकेच्या सहभागाची अपेक्षा आहे, असं वैष्णव यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्राच्या नवनियुक्त उप मुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज मंत्रालयात पदभार स्वीकारला. त्याआधी सुनेत्रा पवार यांनी चैत्यभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पचक्र अर्पण केलं. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर आदींसह आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांच्या वतीनं आयोजित इयत्ता १२ वीच्या परीक्षेला आजपासून सुरूवात झाली.

या परीक्षेसाठी एकंदर १० हजार ६६४ कनिष्ठ महाविद्यालयांमधून १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३८७

मुख्य केंद्रावर ही परीक्षा होणार आहे. प्रचलित पध्दतीप्रमाणे माहिती तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान या दोन विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीनं घेतली जाणार आहे.

कोणतंही दडपण न घेता उत्सवाच्या भावनेने विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

<><><><>

सक्त वसुली संचालनालयानं उद्योजक अनिल अंबानी आणि त्यांच्या पत्नी टीना अंबानी यांना मनी लौंड्रीग प्रकरणात पुढच्या आठवड्यात चौकशीसाठी हजर राहण्याबाबत नव्यानं समन्स बजावलं आहे. टीना अंबानी यांनी आज चौकशीसाठी उपस्थित राहणं अपेक्षित असताना त्या गैरहजर राहिल्या. टीना अंबानी यांना येत्या मंगळवारी तर अनिल अंबानी यांना येत्या शुक्रवारी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितलं असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><>

मणिपूरमधल्या उखरुल जिल्ह्यात काल सशस्त्र हल्लेखोरांनी लिटन सारेखोंग गावात घरांना आग लावली.  या परिसरात याच सशस्त्र गटांनी हवेत गोळीबार केल्यानं रहिवाशांना शेजारच्या कांगपोक्पी जिल्ह्यात पळून जावं लागलं. शनिवारी रात्री लिटन गावात सात ते आठ जणांनी तांगखुल नागा समुदायाच्या एका सदस्यावर हल्ला केल्यानंतर या भागात हिंसाचार सुरू झाला होता.

<><><><>

नवी दिल्लीत एका व्यावसायिकाची  अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केली. ही घटना काल दुपारी बवाना औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात घडली. मोटारसायकलवरून आलेल्या तीन हल्लेखोरांनी आपल्या कारखान्याबाहेर उभ्या असलेल्या व्यावसायिकाची बॅग हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी व्यावसायिकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता हल्लेखोरांनी त्याचा ४० ते ५० मीटर पाठलाग करत व्यावसायिकावर गोळ्या झाडल्या.

<><><><>

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या आजच्या सामन्यात नामिबियाने नेदरलँडसमोर विजयासाठी १५७ धावांचं आव्हान ठेवलं आहे.  नेदरलँडनं नाणेफेक जिंकून नामिबियाला

प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं होतं. नामिबियानं प्रथम फलंदाजी करतांना २० षटकांत ८ गडी बाद १५६ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा नेदरलँडच्या **अकरा** षटकात **दोन** बाद **९०** धावा झाल्या होत्या.

आजचा दुसरा सामना न्यूझिलंड आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये होणार आहे. हा सामना दुपारी तीन वाजल्यापासून चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियमवर सुरु होणार आहे.

आजच्या दिवसाचा तिसरा सामना संध्याकाळी ७ वाजता पाकिस्तान आणि अमेरिका यांच्या दरम्यान होणार असून हा सामना कोलंबोच्या एसएससी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

**//<><><><><>//**